<table>
<tr><th>उपक्रमाचे नाव:</th><th>सारथी वसतिगृह योजना - मातोश्री मुलींचे वसतिगृह नाशिक</th></tr>
<tr><td>उपक्रमाचा उद्देश</td><td>लक्षित घटकातील मुलींची शैक्षणिक उन्नतीसाठी मोफत निवास, भोजन इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध करून देणे</td></tr>
<tr><td>उपक्रमाचे स्वरूप:</td><td>सारथी व महाज्योती तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या विद्यार्थीनींना मोफत निवासी सोय आणि मासिक भोजन भत्ता व निर्वाह भत्ता अदा केला जातो.</td></tr>
<tr><td>प्रशिक्षण ठिकाण:</td><td>मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक</td></tr>
<tr><td>लाभार्थी संख्या:</td><td>
<table>
<tr><td colspan="5">मातोश्री मुलींचे वसतिगृहामध्ये अभ्यासक्रमनिहाय प्रवेशासाठीची संख्या खालीलप्रमाणे राहील.</td></tr>
<tr><td>अ.क्र.</td><td>अभ्यासक्रम</td><td>सारथी मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या ७५</td><td>महाज्योतीमार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या ७५</td><td>उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या : ५०</td></tr>
<tr><td>१</td><td>व्यावसायिक पदवी</td><td>५२</td><td>५२</td><td rowspan="3">उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्राप्त निर्देशानुसार ही ५० विद्यार्थीनींची अभ्यासक्रमनिहाय विगतवारी यादी निश्चित करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>२</td><td>बिगर व्यावसायिक पदवी</td><td>१२</td><td>१२</td></tr>
<tr><td>३</td><td>पदव्युत्तर पदवी</td><td>११</td><td>११</td></tr>
<tr><td></td><td>एकुण</td><td>७५</td><td>७५</td><td>५०</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>लाभार्थी पात्रता:</td><td>१. या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी -मराठा या जातीतील असावा. जात प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित केलेले असावे.<br>२. महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असावा.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | ३. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न हे ₹ ८.०० लाखाच्या आतील असणे आवश्यक आहे.<br>४. वसतिगृह लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनी शासनाच्या इतर वसतिगृहाच्या योजनेचा लाभ घेत नसाव्यात. |
| **शैक्षणिक अर्हता** | शासनाच्या शैक्षणिक धोरणानुसार कोणत्याही अभ्यासक्रमाच्या केवळ प्रथम वर्षास विद्यार्थी प्रवेश मिळण्यास पात्र राहील, मध्यंतरीच्या अभ्यासक्रमास (उदा.जसे १२ वी, B.A २nd Year, B.Com २nd Year) प्रवेश मिळणार नाही. पूर्णवेळ / अर्धवेळ नोकरीवर असलेल्या विद्यार्थ्यास प्रवेश मिळणर नाही. |
| **प्रशिक्षण कालावधी / टप्पे:** | पदवी किंवा पदविका अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत. |
| **लाभार्थी निवड प्रक्रिया’** | विभागीय कार्यालय,सारथी नाशिक यांचेव्दारे जाहिरात देवून प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. |
| **लाभाचे स्वरूप** | सारथी व महाज्योती यांच्या विद्यार्थीनींना मासिक भोजन भत्ता व इतर निर्वाह भत्ते देय राहील. उच्च व तंत्र शिक्षण या विभागाच्या विद्यार्थीनींना त्या विभागाचे शासन निर्णयान्वये भत्ते देय राहतील |
| **योजना सारथीच्या कोणत्या विभागीय कार्यालयामार्फत राबवली जाते(कार्यालयाचे नाव):** | उप-व्यवस्थापकीय संचालक, सारथी, नाशिक |